पनवेल (प्रतिनिधी) शिक्षणातून जीवनाची यशस्वी वाटचाल होत असते, त्यामुळे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशिल आहोत, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज (गुरूवारी) वांवजे येथे केले.

रयत शिक्षण संस्थेच्या वांवजे येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०१४-१५ या वर्षात नियोजित "स्व. गोटीरामशेठ पाटील कॉमर्स व सायन्स ज्युनिअर कॉलेज" या नविन सुरू होणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयाचा तसेच गॅलेक्सी कंपनीच्या माध्यमातून विद्यालयात उभारण्यात आलेल्या प्रयोगशाळेचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, स्वर्गीय गोटीरामशेठ पाटील यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे वांवजे येथे या शाळेच्या पाया रोवला गेला, त्यांनी घेतलेल्या मेहनतीचे आज चिज होत आहे. आज गोटीरामशेठ पाटील यांचे नाव कनिष्ठ महाविद्यालयाला देण्यात येत आहे, ही खऱ्या अर्थाने सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्याकरिता शहराठिकाणी जावे लागत असे, पण आता या "स्व. गोटीरामशेठ पाटील कॉमर्स व सायन्स ज्युनिअर कॉलेज" मुळे वांवजे परिसरातील विद्यार्थ्यांना येथेच शिक्षण घेता येणार असून, हे वांवजे पंचक्रोशीसाठी अभिमानास्पद आहे. प्रयोगशाळा, संगणकीय शिक्षणासोबत अद्यावत इमारत आदी सुविधा विद्यालयांमध्ये असणे ही काळची गरज झाली आहे. वांवजे विद्यालयाची इमारत भव्य व चांगली व्हावी ही ग्रामस्थांची अपेक्षा होती आणि त्यानुसार ही इमारत सुसज्ज अशी झाली आहे, हे जी. आर. पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मेहनतीमुळे शक्य झाले असून ते शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक क्षेत्रात भरीव कामगिरी करत आहेत, अशा शब्दात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जी. आर. पाटील यांचे कौतुक केले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, शाळा, महाविद्यालये उभारणे हे आव्हानात्मक काम असून कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते जी. आर. पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी हे आव्हान यशस्वीरित्या पेलवत वावंजेकराना अभिमान वाटेल अशी भव्य वास्तू उभारून दाखवली आहे. विविध क्षेत्रात काम करताना अनेक अडचणी येतात पण जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यामध्ये यशस्वी होता येते, त्याचप्रमाणे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, अध्यात्मिक क्षेत्रात जी. आर. पाटील यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे, ते ज्या क्षेत्रात जातात तेथे आपले कर्तव्य योग्यरित्या पार पाडतात. या विद्यालयात विविध सुविधांसोबत सेमी इंग्लिश तसेच गुरूकूल असे विविध उप्रकम राबविले जात असल्याने याचा फायदा विद्यार्थ्यांना गुणवत्तावाढी मोठया प्रमाणात होणार असून जी. आर. पाटील यांच्या रूपाने वावंजे परिसराला देणगी मिळाली आहे, असे गौरवोदगार आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले.

स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन जी. आर. पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात म्हंटले की, गेल्या ५० वर्षापासून वांवजे ग्रामस्थ विद्यालयासाठी इमारतीचे स्वप्न पाहात होती. या शाळेची विकट अवस्था झाली होती, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या शाळेस भेट देवून पाहणी केली व इमारतीसाठी ५० लाख रूपयांची देणगी दिली त्यामुळे शालेय इमारतीचे वांवजेकरांचे स्वप्न पुर्ण झाले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे हे शक्य झाले असून त्यांच्यामुळे मला रयत शिक्षण संस्थेत समन्वय समिती सदस्य म्हणून जबाबदारी देण्यात आली असून रामशेठ ठाकूर यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास मी सार्थ ठरवेन, अशी ग्वाही जी. आर. पाटील यांनी देत शिक्षण दानाच्या पवित्र कामासाठी नेहमी मदत करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आम्ही आजन्म ऋणी आहोत अशा शब्दात लोकनेते रामशेठ ठाकूर यांना धन्यवाद दिले.

याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी एस. एस. टेंगळे, गॅलेक्सी कंपनीचे व्यवस्थापक सतिश चव्हाण, कर्मवीर भाऊराव पाटील वाशी महाविद्यालयाचे डॉ. व्ही. एस. शिवणकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय नागरी एवं पर्यावरण विभागाच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर तसेच कामगार नेते महेंद्र घरत, जनरल बॉडी सदस्य अरूणशेठ भगत यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण समितीचे सदस्य महेंद्र घरत, जनरल बॉडी सदस्य अरूणशेठ भगत, महात्मा फुले पनवेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांवळे, प्राचार्य व्ही. व्ही. पाटील, गॅलेक्सी कंपनीचे मॅनेजर श्री. पवार, श्री. कारंडे, वावंजे सरपंच सुरेखा चोरमेकर, माजी मुख्याध्यापक जी. एम. पाटील, स्थानिक स्कूल कमिटीचे व्हाईस चेअरमन बी. एस. पाटील, जाफर शेख, उत्तर भारतीय सेलचे जिल्हाध्यक्ष सुनिल विश्वकर्मा, माजी सरपंच तुकाराम पाटील, लहुशेठ ढोंगरे, स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य वासुदेव चोरमेकर, दशरथ पाटील, ज्युनिअर कॉलेज व्हाईस चेअरमन अब्दुल्लाही शेख, सचिव ज्ञानेश्वर चोरमेकर, जगन्नाथ पाटील, पंकज पाटील, सुभाष गोंधळी, बाळाराम पाटील, महादेव गडगे, हरिशेठ फडके, भगवान सांगडे यांच्या स्थानिक स्कूल कमिटीचे पदाधिकारी, ग्रामस्थ, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.